# महाराष्ट्र शासन
## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग,जि.रायगड.
जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड,लिमये वाडी, अलिबाग.जि.रायगड -४०२ २०१
## GOVERNMENT MEDICAL COLLEGE, ALIBAG -RAIGAD
DISTRICT CIVIL HOSPITAL AREA, ALIBAG BEACH ROAD, LIMYEWADI, ALIBAG DIST.RAIGAD - 402 201

Email- deangmcalibag@gmail.com Phone No. ०२१४१-२९९२१४ www.gmchalibag.in/gmch


जा.क्र.शावैमअ/ **Biochemistry Reagents** /दरपत्रक मागणी/ २९८७ /२०२५ दिनांक. २९/०९/२०२५

दरपत्रक मागणी पत्र.

प्रति,

-------------------

-------------------

-------------------

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग-रायगड या संस्थेच्या जीवरसायनशास्त्र विभागातील प्रयोगशाळेतील कार्यरत Fully Automatic Biochemistry Analyzer या यंत्रसामुग्री करिता लागणारे अनुषंगीक बाबी (Consumable/Reagents) ची खरेदी करणेबाबत

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड संस्थेतील जीवरसायनशास्त्र प्रयोगशाळेतील कार्यरत Fully Automatic Biochemistry Analyzer या यंत्रसामुग्री करिता लागणारे (Consumable/Reagents) ची तातडीची आवश्यता आहे. त्याअनुषगाने बाबींची खरेदी ही खालील नमुन्यात मोहरबंद लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्ती नुसार सादर करावेत.

| Sr. No. | Particulars | Pack Size | Quantity (Unit Pack) | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | **Total Billirubin** | **6 x 44 ml/ 6 x 12.3 ml** | **01** | **Including all Taxes** |
| 2. | **Direct Billirubin** | **6 x 44 ml / 6 x 12.3 ml** | **01** | |
| 3 | **Glucose 10*44** | **10 x 44** | **01** | |
| 4 | **SGOT** | **6x 44 ml / 6 x 12.5 ml** | **01** | |
| 5 | **Urea** | **5 x 44 ml / 5 x 11 ml** | **01** | |
| 6 | **Creatinine** | **5 x 30 ml / 5 x 10 ml** | **01** | |
| 7 | **Acid Base Wash** | **5 x 44 ml / 5 x 44 ml** | **01** | |
| 8 | **Autowash** | **10 x 100 ml** | **01** | |
| 9 | **Multical** | **4 x 3 ml** | **01** | |
| 10 | **ERBA PATH (Control)** | **4 x 5 ml** | **01** | |
| 11 | **ERBA NORM (Control)** | **4 x 5 ml** | **01** | |

अटी व शर्ती.

१. सदर **Consumable/Reagents** च्याखरेदी करीता प्राधिकृत/अधिकृत वितरक पुरवठादार यांनी सदर **(Consumable/Reagents)** पुरवठा करणेबाबत, मुळ उत्पादक/पुरवठादार यांनी अधिकृत केलेले प्रमाणपत्र दरपत्रकासोबत सादर करणे बंधनकारक आहे. अधिकृत केलेले प्रमाणपत्र दरपत्रकासोबत सादर न केल्यास दरपत्रक अपात्र ठरविण्यात येईल.

२. दरपत्रक मोहरबंद लिफाफा , दि. १०/१०/२०२५ रोजी साय ०५:०० वाजेपर्यंत कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही/ग्राहय धरले जाणार नाही.

३. दरपत्रक मोहोरबंद लिफाफा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग. जि.रायगड ४०२ २०१ (जिल्हा रुग्णालय आवार) यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यावर दरपत्रक मागणी क्रमांक, तारीख, व विभागाचे नाव Biochemistry Reagents असे लिहुन सादर करावे.

४. लिफाफ्यावर पुरवठाधारकाचे पुर्ण नाव, भ्रमणध्वनी क्र. आणि संपूर्ण पत्ता, संकेतांक क्र. (Email address) लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक (१०/१०/२०२५), दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमुद असणे आवश्यक आहे.

५. दर पत्रकात नमुद केलेले दर सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी ग्राहय धरले जातील.

६. प्रस्तावित उदिदष्टांकरिता दरपत्रक आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा व इ-औषधी वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय महाराष्ट्र संकेतस्थळावर दिलेले दरांपेक्षा (https://medd-eproc .in/IMCS / hissso/) अधिक नसावेत.

७. सर्वात कमी (L-१) दरपत्रकास खरेदी समितीच्या मान्यता अन्वये पुरवठा आदेशाकरिता विचार करण्यात येईल.

८. सदर उदिदष्टांची किंमत, सर्व करांसहीत (including all taxes )एकुण किंमत अशी दर्शविण्यात यावी.

९. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये. दरपत्रक हे पुर्णपणे छापील असावे. हस्तलिखित दरपत्रके ग्राहय धरले जाणार नाहीत.

१०. दरपत्रक मोहोरबंद लिफाफयात सादर करावयाचे दस्ताऐवज ( **Documents Required**)

१) अधिकृत लेटरहेडवर दरपत्रक दिलेल्या विनिर्दिष्टेनुसार असावेत २).जी.एस.टी.क्रमांक पत्र.

३) दुकानाचा परवाना क्रमांक सोबत जोडलेल्या नमुन्यानुसार सदर दस्तऐवज सादर केले नाही व अपुर्ण (विना स्वाक्षरी) असल्यास, तर सदरील पुरवठाधारकाचे दर न्युनतम असले तरीही दरपत्रक ग्राहय धरले जाणार नाही.

११. ज्या पात्र दरपत्रक धारकाचे दर हे न्यूनतम असतील व दस्ताऐवज पुर्ण असतील अशा पुरवठादारास पुरवठा आदेश मिळाल्यानंतर दरपत्रदारकास आवश्यकते नुसार विकृतीशास्त्र विभागासाठीचा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील.

१२. पुरवठा आदेश मिळाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत पुरवठा न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्यात येईल, व व्दितीय न्युनतम पात्र पुरवठाधारकाला प्रथम न्युनतम दराने पुरवठा आदेश देण्यात येतील. पुरवठादाराने पुरवठा करण्यासाठी वाहतुक खर्च स्वत: करण्यात यावा.

१३. पुरवठा करण्यात येणारे Biochemistry Reagents चा कालबाहय दिनांक (Expiry date) पुरवठा आदेश दिनांकापासुन एक वर्षापेक्षा अधिक असावेत व त्यांचा दर्जा उत्तम असावा.

१४. संबंधित Biochemistry Reagents हे वैद्यकीय वापरासाठी योग्य असून, सर्व आवश्यक व गुणवत्ता निकष पूर्ण केलेले आहेत, याचे प्रमाणपत्र (Compliance Certificate) दरपत्रकासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

१५. संस्थास्तरावरील औषधी, सर्जिकल आणि तदअनुषंगीक बाबींची दरपत्रके, निविदा व स्थानिक खरेदी करतांना पुरवठादार/उत्पादक यांनी आवश्यकतेनुसार खालील बाबींची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

- Valid WHO GMP Certificate and WHO GMP product list or COPP for quoted Items.
- In House test report for purchased item.
- **National Accreditation Board for Testing and Calibration Laboratories (NABL test report). Compulsory.**
- Non conviction certificate issued from concern FDA for manufacturer/Distributor.
- For Consumables: ISO 13485 (International Organisation for Standardisation). 150 17025, 150 45001, ISO 14001. GMP (Good Manufacturing Practices)/Schedule M. Quality Management System (QMS) for Medical Devices, Central Drugs Standard Control Organisation (CDSCO) approved MD License.

१६. अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे तसेच कोणतेही स्तरावर खरेदी प्रक्रिया रद्द करणे हे अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखून ठेवले आहेत.

१७. पुरवठा पुर्ण झाल्यानंतर तीन प्रतीत देयके (Tax Invoice) हि अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग जि. रायगड यांचे नावाने देण्यात यावेत.

१८. देयकाची अदायगी ही शासनाकडून अनुदान प्राप्त होण्याच्या अधीन राहून करण्यात येईल. देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे विलंब व दंडात्मक शुल्क अदा केले जाणार नाही.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
अलिबाग रायगड.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकिय महाविद्यालय,
अलिबाग रायगड

प्रत - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, तसेच जिल्हा सामान्य रुणालय, अलिबाग-रायगड यांच्या सुचना फलकावर दरपत्रक मागविणया संदर्भात दिनांक :०९/१०/२०२५ सुचना देण्यात आल्या आहेत.